# THE BOMBAY LABOUR WELFARE FUND ACT, 1953
## (Bombay Act No. XL of 1953)

## मुंबई कामगार कल्याण निधि अधिनियम, १९५३

### अनुक्रमणिका.

प्रस्तावना


| कलमें | | पान |
|---|---|---|
| १ | लघु संज्ञा, व्याप्ति व प्रारंभ | १०४३ |
| २ | व्याख्या | १०४३ |
| ३ | कल्याण निधि | १०४४ |
| ४ | मंडळ | १०४५ |
| ५ | अपात्रता व पदावरून काढून टाकणें | १०४५ |
| ६ | सदस्यानें पदाचा राजीनामा देणें व आकस्मिक रीत्या रिकाम्या होणाऱ्या जागा भरणें | १०४६ |
| ७ | निधि निहित असणें व त्याचा विनियोग | १०४६ |
| ८ | पैसा कर्जाऊ घेण्याचा मंडळाचा अधिकार | १०४७ |
| ९ | निधि गुंतविणें | १०४७ |
| १० | राज्य सरकारनें मंडळास द्यावयाचे निदेश | १०४७ |
| ११ | वेल्फेअर कमिशनरची नेमणूक व त्याचे अधिकार | १०४७ |
| १२ | निरीक्षकांची नेमणूक | १०४७ |
| १३ | लेबर कमिशनरच्या हाताखालीं असलेला विद्यमान नोकरवर्ग सामावून घेणें | १०४७ |
| १४ | मंडळानें कारकून व इतर नोकरवर्ग नेमणें | १०४८ |
| १५ | मंडळाच्या नोकरवर्गांतील कोणत्याहि इसमास नोकरीवरून काढून टाकण्याचा राज्य सरकारचा अधिकार. | १०४८ |
| १६ | राज्यसरकारचा किंवा अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचा कागदपत्रें इत्यादि मागविण्याचा अधिकार. | १०४८ |
| १७ | निधीस द्यावयाच्या रकमा वसूल करण्याची पद्धत | १०४८ |
| १८ | मंडळ रद्द करणें | १०४८ |
| १९ | नियम | १०४९ |
| २० | मंडळाचे सदस्य, वेल्फेअर कमिशनर, निरीक्षक आणि मंडळाचे सर्व अधिकारी व नोकर हे सरकारी नोकर म्हणून समजणें. | १०४९ |
| २१ | सद्भावनापूर्वक काम करणाऱ्या इसमाचें संरक्षण | १०५० |
| २२ | माफी | १०५० |
| २३ | सन १९३६ चा अधिनियम क्रमांक ४, कलम ८ ची सुधारणा | १०५० |

# सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०*

## [मुंबई कामगार कल्याण निधि अधिनियम, १९५३]

[१७ जून १९५३]

## मुंबई राज्यांतील कामगार हितसंवर्धक कार्यांना आर्थिक साहाय्य देण्याकरितां व अशीं कार्यें चालविण्याकरितां एक निधि स्थापण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई राज्यांतील कामगार हितसंवर्धक कार्यांना आर्थिक साहाय्य देण्याकरितां व अशीं कार्यें चालविण्याकरितां एक निधि स्थापणें इष्ट आहे ; त्याअर्थी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. (१) या अधिनियमास मुंबई कामगार कल्याण निधि अधिनियम, १९५३ असें म्हणावें. लघु संज्ञा, व्याप्ति व प्रारंभ.

(२) तो मुंबई राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें याबाबतींत नेमील अशा क्षेत्रांत व अशा तारखेस अंमलांत येईल.

२. या अधिनियमांत, संदर्भाविरून इतर रीतीनें अर्थ लावणें आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(१) "मंडळ" या संज्ञेचा अर्थ, कलम ४ अन्वयें रचना करण्यांत आलेलें मुंबई कामगार कल्याण मंडळ, असा समजावा.

(२) "नोकर" या संज्ञेचा अर्थ एखाद्या संस्थेंत कोणतेंहि काम करण्यासाठीं, मग तें कसबी असो किंवा बिन कसबी असो, अंगमेहनतीचें असो किंवा कारकुनी असो, मजुरीनें किंवा बक्षिस देऊन कामावर लावलेला कोणताहि इसम, असा समजावा.

(३) "मालक" या संज्ञेचा अर्थ, एखाद्या संस्थेंत प्रत्यक्षपणें किंवा दुसऱ्या इसमामार्फत, स्वतःच्या किंवा इतर कोणत्याहि इसमाच्या वतीनें एक किंवा अनेक इसमांना कामावर लावणारा कोणताहि इसम, असा समजावा ; आणि तींत पुढील इसमांचा समावेश होतो :—

(१) कारखान्यांत, कारखाने अधिनियम, १९४८ याचें कलम ७ (१) (फ) अन्वयें व्यवस्थापक या नांवानें ओळखण्यांत येणारा कोणताहि इसम ;

(२) कोणत्याहि संस्थेंत, कामावर लावलेल्या इसमांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यास किंवा वेतन देण्यास मालकास जबाबदार असणारा कोणताहि इसम.

(४) "संस्था" या संज्ञेचा अर्थ—

(१) कारखाना ;

(२) ट्रामवे किंवा मोटार बस सर्व्हिस ; आणि

(३) मंडळ्यांची नोंदणी अधिनियम, १८६० अन्वयें नोंदलेली मंडळी, आणि कोणताहि धंदा किंवा व्यापार किंवा त्याच्याशी संबंध असलेलें किंवा त्यास आनुषंगिक असलेले कोणतेहि काम करणारी व जींत पन्नासपेक्षां अधिक इसम कामावर लावलेले आहेत किंवा मागील बारा महिन्यांच्या अवधींत कोणत्याहि कामाच्या दिवशीं पन्नासपेक्षां अधिक इसम कामावर लावलेले होते अशी धर्मादाय किंवा इतर विश्वस्त व्यवस्था धरून, मग ती मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वयें नोंदलेली असो किंवा नसो, कोणतीहि संस्था, असा समजावा परंतु तींत केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याहि राज्य सरकारच्या संस्थेचा समावेश होत नाहीं ;

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

(५) "कारखाना" या संज्ञेचा अर्थ, कारखाने अधिनियम, १९४८ याचें कलम २ (म) यांत व्याख्या केलेला कारखाना, असा समजावा ;

(६) "निधि" या संज्ञेचा अर्थ, कलम ३ अन्वयें स्थापन केलेला मुंबई कामगार कल्याण निधि, असा समजावा ;

(७) "स्वतंत्र सदस्य" या संज्ञेचा अर्थ, ज्याचा कोणत्याहि संस्थेच्या व्यवस्थेशीं संबंध नाहीं किंवा जो नोकर नाहीं असा मंडळाचा सदस्य, असा समजावा, व तींत सदस्य म्हणून नियुक्त केलेल्या सरकारी अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(८) "निरीक्षक" या संज्ञेचा अर्थ, कलम १२ अन्वयें नेमलेला निरीक्षक, असा समजावा ;

(९) "विहित" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वयें केलेल्या नियमाद्वारें विहित केलेलें, असा समजावा ;

(१०) "न दिलेल्या सांचलेल्या रकमा" या संज्ञेचा अर्थ, वेतन व कायद्यानें देण्याजोगें उपदान धरून नोकरांस द्यावयाच्या परंतु या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर ज्या तारखेस त्या देय झाल्या त्या तारखेपासून तीन वर्षांच्या मुदतींत त्यांना न दिलेल्या सर्व रकमा, असा समजावा ;

(११) "वेतन" या संज्ञेचा अर्थ, नोकरीच्या कराराच्या स्पष्ट किंवा गर्भित शर्ती पुऱ्या केल्यास कामावर लावलेल्या इसमास, त्याच्या नोकरीच्या किंवा अशा नोकरींत त्यानें केलेल्या कामाच्या संबंधांत त्यास द्यावयाचे पैशाच्या स्वरूपांत निर्दिष्ट केलेले सर्व पारिश्रमिक, असा समजावा ; परंतु त्यांत पुढील गोष्टींचा समावेश होत नाहीं :—

(अ) (१) राहण्याची जागा, दिवाबत्ती, पाणीपुरवठा, वैद्यकीय मदत यांची किंमत ;

(२) राज्य सरकारच्या सामान्य किंवा विशेष आदेशान्वयें वगळलेल्या कोणत्याहि इतर सुख-सोईची किंवा कामाची किंमत ;

(ब) कोणत्याहि निवृत्तिवेतन निधीस किंवा भविष्य निधीस किंवा सामाजिक विम्याच्या कोणत्याहि योजनेंखाली मालकानें दिलेलें कोणतेंहि अंशदान ;

(क) कोणताहि प्रवासभत्ता किंवा प्रवासाच्या कोणत्याहि सवलतीची किंमत ;

(ड) कामावर लावलेल्या कोणत्याहि इसमास, त्याच्या नोकरीच्या स्वरूपामुळें त्यास करावा लागलेला खास खर्च भागविण्यासाठीं दिलेली कोणतीहि रक्कम ; किंवा

(इ) सेवामुक्त केल्यानंतर द्यावयाचें कोणतेंहि उपदान ;

(१२) "वेल्फेअर कमिशनर" या संज्ञेचा अर्थ, कलम ११ अन्वयें नेमलेला वेल्फेअर कमिशनर, असा समजावा.

कल्याण निधि. ३. (१) मुंबई कामगार कल्याण निधि या नांवाचा एक निधि स्थापन करण्यांत आला पाहिजे आणि त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्यांत कांहींहि असलें तरी, पोट-कलम (२) मध्यें निर्दिष्ट केलेल्या रकमा सदरहू निधींत भरल्या पाहिजेत.

(२) सदरहू निधींत पुढील गोष्टींचा समावेश असेल :—

(अ) नोकराकडून वसूल केलेल्या दंडाच्या सर्व रकमा ;

(ब) न दिलेल्या सांचलेल्या सर्व रकमा ;

(क) स्वेच्छेनें दिलेल्या कोणत्याहि देणग्या ;

(ड) कलम ७ पोट-कलम (५) अन्वयें हस्तांतरित केलेला कोणताहि निधि ; आणि

(इ) कलम ८ अन्वयें कर्जाऊ घेतलेली कोणतीहि रक्कम.

(३) पोट-कलम (२) मध्यें निर्दिष्ट केलेल्या रकमा विहित करण्यांत येतील अशा एजन्सीमार्फत व अशा रीतीनें वसूल केल्या पाहिजेत आणि सदरहू निधीचे हिशेब विहित करण्यांत येईल अशा रीतीनें ठेवले व तपासले पाहिजेत

४. (१) राज्य सरकारनें राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें निधीची व्यवस्था ठेवण्याच्या प्रयोजनासाठीं व या अधिनियमाद्वारें किंवा तदन्वयें मंडळाकडे सोंपविलेलीं अशी इतर कामें पार पाडण्यासाठीं मंडळाची रचना केली पाहिजे. सदरहू मंडळांत पुढील सदस्य असतील :— मंडळ.

(अ) राज्य सरकारनें नियुक्त करावयाचे मालकांचे व नोकरांचे विहित करण्यांत येतील इतके प्रतिनिधि, परंतु मालक व नोकर या दोघांनाहि मंडळावर समान प्रतिनिधित्व असेल ;

(ब) राज्य सरकारनें नियुक्त केलेले विहित करण्यांत येतील इतके स्वतंत्र सदस्य ; आणि

(क) स्त्रियांचे प्रतिनिधित्व करण्यासाठीं राज्य सरकारनें नियुक्त केलेले विहित करण्यांत येतील इतके स्वतंत्र सदस्य.

(२) मंडळाच्या सदस्यांनीं मंडळाचा सभापति म्हणून आपल्या स्वतंत्र सदस्यांतून एकास निवडलें पाहिजे.

(३) या अधिनियमान्वयें अन्यरीत्या स्पष्टपणें तरतूद करण्यांत आली असेल त्याव्यतिरिक्त, मंडळाच्या सदस्यांच्या पदाची मुदत ज्या तारखेस त्यांची नांवें राजपत्रांत अधिसूचित करण्यांत आली असतील त्या तारखेपासून तीन वर्षे असेल.

(४) मंडळाच्या सदस्यांना द्यावयाचे भत्ते, कोणतेहि असल्यास, व मालकांच्या व नोकरांच्या प्रतिनिधींच्या नेमणुकीच्या अटी हृचा विहित करण्यांत येतील अशा असतील.

(५) मंडळ ही मुंबई कामगार कल्याण मंडळ या नांवाची एक एकव्यक्तिभूत संस्था असेल, त्याची परंपरा अखंड असेल व त्याचा एक सामाईक शिक्का असेल आणि त्यास जंगम किंवा स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा अधिकार असेल, व त्यास उक्त नांवानें दावा लावतां येईल तसेंच या नांवानें त्याजवर दावा लावतां येईल.

५. (१) पुढील कोणताहि इसम मंडळाचा सदस्य म्हणून निवडण्यांत येणार नाहीं किंवा सदस्य म्हणून राहणार नाहीं :— अपात्रता व पदावरून काढून टाकणें.

(अ) जो मंडळाचा पगारी अधिकारी आहे असा इसम ; अथवा

(ब) ज्यास न्यायालयानें नादार म्हणून ठरविलें आहे किंवा ठरविलें होते किंवा ज्यानें आपल्या कर्जाची परतफेड करण्याचें तहकूब केलें आहे किंवा आपल्या धनकोशीं तडजोड केली आहे असा इसम ; अथवा

(क) जो वेडा असल्याचें आढळून आलें आहे किंवा जो विकृतचित्त झाला आहे असा इसम ; अथवा

(ड) ज्यास नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव होणाऱ्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यांत आले आहे किंवा दोषी ठरविण्यांत आले होतें असा इसम.

(२) राज्य सरकारला पुढील कोणत्याहि सदस्यास पदावरून काढून टाकण्याचा अधिकार आहे :—

(अ) जो पोट-कलम (१) मध्यें उल्लेख केल्याप्रमाणें अपात्र आहे किंवा होता असा इसम ; अथवा

(ब) जो मंडळाच्या परवानगीवांचून मंडळाच्या लागोपाठ तीनपेक्षां अधिक सभांना गैरहजर राहिला असेल असा इसम.

सदस्यानें पदाचा राजीनामा देणें व आकस्मिकरीत्या रिकाम्या होणाऱ्या जागा भरणें.

६. (१) एखाद्या सदस्यास, त्याबद्दल राज्य सरकारला लेखी नोटिस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देण्याचा अधिकार आहे, आणि असा राजीनामा स्वीकारण्यांत आल्यानंतर अशा सदस्यानें आपलें पद रिकामें केलें आहे असें समजलें पाहिजे.

(२) एखाद्या सदस्याची आकस्मिकरीत्या रिकामी झालेली जागा संबंधित प्राधिकाऱ्यानें, सोईस्करपणें शक्य होईल तितक्या लवकर, भरली पाहिजे आणि अशा रीतीनें नियुक्त केलेला सदस्य त्याच्या पूर्वीच्या सदस्याच्या पदाच्या मुदतीपैकीं राहिलेल्या मुदतीपर्यंत तें पद धारण करील.

(३) मंडळांत कोणतीहि जागा रिकामी झाली आहे किंवा मंडळाच्या रचनेंत कोणताहि दोष आहे याच केवळ कारणावरून मंडळाच्या कोणत्याहि कृत्यास किंवा कारवाईस हरकत घेतां येणार नाहीं.

निधि निहित असणें व त्याचा विनियोग.

७. (१) या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून व त्याच्या प्रयोजनाकरितां हा निधि विश्वस्त म्हणून मंडळाकडे निहित असेल व तो मंडळानें धारण केला पाहिजे व त्याचा विनियोग केला पाहिजे कामगार व त्यांचे आश्रित यांच्या हितसंवर्धनासाठीं राज्य सरकार वेळोवेळीं निर्दिष्ट करील त्या योजना पार पाडण्याचा खर्च भागविण्यासाठीं मंडळानें निधीतील पैशाचा विनियोग केला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) च्या सामान्यतेस बाध न येतां पुढील गोष्टींचा खर्च भागविण्यासाठीं निधीतील पैशाचा उपयोग करण्याचा मंडळास अधिकार आहे :—

(अ) वाचनालयें व ग्रंथालयें धरून सामुहिक व सामाजिक शिक्षण केंद्रें ;

(ब) सामुहिक गरजा ;

(क) खेळ व क्रीडा ;

(ड) सहली, दौरे व विश्रामधामें (हॉलिडे होम्स) ;

(इ) करमणूक व श्रमपरिहाराचे इतर प्रकार ;

(फ) गृहोद्योग आणि स्त्रिया व बेकार इसम यांच्यासाठीं दुय्यम धंदे ;

(ग) सामाजिक स्वरूपाची सामुदायिक कार्यें ;

(ह) अधिनियमाच्या प्रयोजनाकरितां नेमलेल्या नोकरवर्गाचा पगार व भत्ते धरून अधिनियमाच्या अंमलबजावणीचा खर्च ;

(आय्) राज्य सरकारच्या मतें ज्या योगें कामगारांच्या राहणीचें मान उंचावेल व त्यांची सामाजिक परिस्थिति सुधारेल अशीं इतर उद्दिष्टें :

परंतु, त्यावेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें जी कोणतीहि योजना पार पाडणें मालकास आवश्यक असेल त्या योजनेला पैसा पुरविण्याकडे त्या निधीचा उपयोग करतां कामा नये ;

तसेंच वेतन देण्याबाबत अधिनियम, १९३६ मध्यें किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्यांत कांहींहि असलें तरी न दिलेल्या सांचलेल्या रकमा व दंड यांचा मंडळाकडे भरणा केला पाहिजे व मंडळानें तो खर्च केला पाहिजे.

(३) मंडळास, राज्य सरकारच्या संमतीनें राज्य सरकारनें मान्यता दिलेल्या कोणत्याहि कामगार कल्याण कार्यासाठीं मदत म्हणून कोणत्याहि मालकास, कोणत्याहि स्थानिक प्राधिकाऱ्यास किंवा इतर कोणत्याहि संस्थेस निधींतून अनुदान देण्याचा अधिकार आहे.

(४) एखादा विशिष्ट खर्च निधि खातीं खर्ची टाकता येण्याजोगा आहे किंवा नाहीं असा एखादा प्रश्न उपस्थित झाल्यास, ती बाब राज्य सरकारकडे सोंपविली पाहिजे आणि राज्य सरकारनें दिलेला निर्णय अंतिम असेल.

(५) जर उक्त निधीचे मंडळाकडे योग्य रीतीनें हस्तांतरण करण्यांत आले असेल तर, कोणत्याहि संस्थेच्या कामगार कल्याण निधींतून आर्थिक मदत मिळत असलेलें कोणतेंहि कार्य मंडळानें चालूं ठेवणें वैध असेल.

८. मंडळास राज्य सरकारच्या पूर्वमंजुरीनें व या अधिनियमाच्या उपबंधांस आणि या बाबतींत निर्दिष्ट करण्यांत येतील अशा अटींस अधीन राहून या अधिनियमाच्या प्रयोजनाकरितां आवश्यक असलेली कोणतीहि रक्कम वेळोवेळीं कर्जाऊ घेण्याचा अधिकार आहे. पैसा कर्जाऊ घेण्याचा मंडळाचा अधिकार.

९. या अधिनियमाच्या उद्देशपूर्तीसाठीं अशा निधीचा किंवा त्याच्या कोणत्याहि भागाचा लवकर विनियोग करणें शक्य नसेल तर मंडळानें भारतीय विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १८८२ याचें कलम २०, कंडिका (अ) ते (ड) व (फ) मध्यें निर्दिष्ट केलेल्या रोख्यांपैकीं कोणत्याहि रोख्यांत तो गुंतविला पाहिजे. निधि गुंतविणें.

१०. अशा निधींतून करावयाच्या खर्चाच्या संबंधांत किंवा अधिनियमाचे इतर हेतू पार पाडण्याकरितां राज्य सरकारच्या मतें आवश्यक किंवा इष्ट असतील असे निदेश मंडळास देण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे. अशा निदेशांचें पालन करणें हें मंडळाचें कर्तव्य असेल. राज्य सरकारनें मंडळास द्यावयाचे निदेश.

११. (१) (१) राज्य सरकारच्या पूर्व मंजुरीनें मंडळानें वेल्फेअर कमिशनरची नेमणूक केली पाहिजे ; वेल्फेअर कमिशनरची नेमणूक व त्याचे अधिकार.

(२) वेल्फेअर कमिशनर हा मंडळाचा अंमलबजावणी करणारा मुख्य अधिकारी असेल ;

(३) या अधिनियमाच्या उपबंधांची व तदन्वयें केलेल्या नियमांची योग्य रीतीनें अंमलबजावणी करण्यांत येत आहे याबद्दल खात्री करून घेणें हें वेल्फेअर कमिशनरचें कर्तव्य असेल आणि या प्रयोजनाकरितां, या अधिनियमान्वयें किंवा तदन्वयें केलेल्या नियमान्वयें मंडळानें घेतलेले निर्णय अंमलांत आणण्याविषयींचा कोणताहि आदेश धरून अधिनियमाचे उपबंधांशी व तदन्वयें केलेले नियमांशीं विसंगत नसलेले त्यास योग्य वाटतील असे आदेश देण्याचा अधिकार असेल.

(२) पोट-कलम (१) मध्यें कांहींहि असलें तरी, राज्य सरकारनें, हा अधिनियम संमत झाल्यावर शक्य होईल तितक्या लवकर पांच वर्षांपेक्षां अधिक नसलेल्या मुदतीसाठीं व राज्य सरकारला योग्य वाटेल अशा अटींवर पहिला वेल्फेअर कमिशनर नेमला पाहिजे.

१२. (१) निधीस द्यावयाच्या रकमांच्या संबंधांतील कागदपत्रें तपासण्यासाठीं निरीक्षकांची नेमणूक करण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे. निरीक्षकांची नेमणूक.

(२) कोणत्याहि निरीक्षकास पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे :—

(अ) त्यास योग्य वाटेल अशी, मदत घेऊन, कोणतीहि असल्यास, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठीं कोणत्याहि जागेंत कोणत्याहि वाजवी वेळीं प्रवेश करणें ;

(ब) विहित करण्यांत येतील असे इतर अधिकार चालविणें.

१३. (१) मंडळानें, राज्य सरकार निदेश देईल असा मुंबईच्या लेबर कमिशनरच्या नियंत्रणाखाली असलेला विद्यमान नोकरवर्ग आपल्या नोकरींत घेतले पाहिजेल आणि अशा रीतीनें नोकरींत घेतलेला प्रत्येक इसम या अधिनियमाच्या उपबंधांस व तदन्वयें केलेल्या नियमांस अधीन असेल. लेबर कमिशनरच्या हाताखालीं असलेला नोकरवर्ग सामावून घेणें.

परंतु—

(अ) अशा नोकरीच्या मुदतींत उक्त नोकरवर्गाचा पगार, रजा, सेवानिवृत्तिभत्ते, निवृत्तिवेतनें भविष्य निधि व नोकरीच्या इतर अटी ह्या मुंबई सरकारी नोकऱ्याबाबत नियमाद्वारें किंवा राज्य सरकार वेळोवेळीं करील अशा इतर नियमाद्वारें विनियमित करण्यांत येतील ;

(ब) अशा प्रत्येक सदस्याला खालच्या दर्जावर घालणाऱ्या, नोकरींतून बडतर्फ करणाऱ्या किंवा नोकरीवरून काढून टाकणाऱ्या, दंड करणाऱ्या किंवा इतर कोणतीहि शिक्षा देणाऱ्या आदेशाविरुद्ध राज्य सरकारकडे अपील करण्याचा हक्क असेल :

तसेंच अशा रीतीनें नोकरींत घेतलेल्या इसमास, या अधिनियमान्वयें मंडळानें नेमलेल्या नोकरवर्गाच्या नोकरीच्या अटींसंबंधीं या अधिनियमान्वयें केलेले नियम आपणास लागू करावेत अशी विहित केलेल्या मुदतींत इच्छा प्रदर्शित करण्याचा अधिकार आहे आणि अशा रीतीनें त्यानें इच्छा प्रदर्शित केल्यावर पहिल्या परंतुकाचे उपबंध त्यास लागू होण्याचें बंद होईल.

मंडळानें कारकून व इतर नोकर-वर्ग नेमणें.

१४. मंडळास, निधींतून आर्थिक मदत मिळालेलीं कार्ये पार पाडण्यासाठीं व त्यावर देखरेख ठेवण्यासाठीं आवश्यक असलेले कारकून व अंमलबजावणीविषयक नोकरवर्ग नेमण्याचा अधिकार आहे :

परंतु अशा रीतीनें नेमलेल्या नोकरवर्गाचा खर्च व इतर शासनीय खर्च त्या निधीच्या वार्षिक उत्पन्नाच्या विहित केलेल्या शेकडा प्रमाणापेक्षां अधिक असतां कामा नये.

मंडळाच्या नोकर-वर्गांतील कोणत्याहि इसमास नोकरीवरून काढून टाकण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

१५. राज्य सरकारला, त्यास अयोग्य वाटणाऱ्या कोणत्याहि इसमास मंडळाच्या नोकरींतून काढून टाकण्याचा आणि ज्याच्या बाबतींत मंडळाच्या सदस्यांपैकी एक तृतीयांश सदस्य सहमत नसतील त्या बाबतींत नेमणूक करण्याचा अधिकार असेल.

राज्य सरकारचा किंवा अधिकृत केलेल्या अधि-काऱ्याचा कागदपत्रें मागविण्याचा अधिकार.

१६. राज्य सरकारला किंवा राज्य सरकारनें अधिकृत केलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्याला मंडळाचीं कागदपत्रें मागविण्याचा व तीं तपासण्याचा अधिकार आहे आणि मंडळाच्या कामावर देखरेख ठेवण्याचा अधिकार आहे.

निधीस द्यावयाच्या रकमा वसूल करण्याची पद्धत.

१७. या अधिनियमान्वयें निधीस द्यावयाची कोणतीहि रक्कम, वसूल करण्याचा इतर कोणत्याहि पद्धतीस बाध न येतां, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे मंडळाच्या वतीनें वसूल केली पाहिजे.

मंडळ रद्द करणें.

१८. (१) या अधिनियमाद्वारें किंवा तदन्वयें मंडळावर लादलेली कोणतीहि कर्तव्यें पार पाडण्याच्या कामीं मंडळानें कसूर केली आहे किंवा आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला आहे अशी राज्य सरकारची खात्री झाली असेल तर राज्य सरकारला राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें विहित केलेल्या रीतीनें मंडळ रद्द करण्याचा व त्याची पुनर्रचना करण्याचा अधिकार आहे :

परंतु, या पोट-कलमान्वयें अधिसूचना काढण्यापूर्वी राज्य सरकारनें, मंडळ रद्द कां करूं नये याचें कारण दर्शविण्याची मंडळाला योग्य संधि दिली पाहिजे व मंडळाच्या स्पष्टीकरणांचा व आक्षेपांचा, कोणतेहि असल्यास, विचार केला पाहिजे.

(२) मंडळ रद्द करण्यांत आल्यानंतर व त्याची पुनर्रचना करण्यांत येईपर्यंत या अधिनियमाखालील मंडळाचे अधिकार, कर्तव्यें व कामें मंडळानें किंवा राज्य सरकार या कारणाकरितां नेमील अशा अधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्यांनीं चालविले किंवा पार पाडली पाहिजेत.

१९. (१) राज्य सरकारला राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें व पूर्वप्रसिद्धीच्या अटीस अधीन राहून या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरितां नियम करण्याचा अधिकार आहे. नियम.

(२) विशेषत: व पूर्वगामी अधिकाराच्या सामान्यतेस बाध न येतां पुढील सर्व किंवा त्यांपैकीं कोणत्याहि गोष्टींसाठीं असे नियम करतां येतील :—

(अ) कलम (३), पोट-कलम (३) मध्यें निर्दिष्ट केलेल्या रकमा कोणाच्या मार्फत वसूल करावयाच्या तें व ज्या रीतीनें वसूल करावयाच्या ती रीत ; आणि त्या रकमा ज्या मुदतींत निधीत जमा केल्या पाहिजेत ती मुदत ;

(ब) कलम ३ पोट-कलम (३) अन्वयें निधीचे हिशेब ज्या रीतीनें ठेवले पाहिजेत व तपासलें पाहिजेत ती रीत ;

(क) कलम ७ अन्वयें निधीतून अनुदानें देण्याची कार्यपद्धति ;

(ड) निधीची व्यवस्था ठेवण्यासाठीं झालेला खर्च भागविण्याची कार्यपद्धति ;

(इ) कलम ४ अन्वयें मंडळावर मालकांचे व नोकरांचे प्रतिनिधी, स्वतंत्र सदस्य व स्त्रियांचे प्रतिनिधी यांची संख्या, आणि त्यांना द्यावयाचे भत्ते, कोणतेहि असल्यास ;

(फ) ज्या रीतीनें मंडळानें आपलें काम चालविलें पाहिजे ती रीत ;

(ग) या अधिनियमान्वयें नेमलेल्या निरीक्षकांची कर्तव्यें व अधिकार आणि वेल्फेअर कमिशनर व निरीक्षक आणि इतर नोकरवर्ग यांच्या नोकरीच्या अटी ;

(ग-अ) मंडळाचे अधिकार व कामें वेल्फेअर कमिशनरकडे सोंपविणें आणि ज्या शर्तींस व मर्यादांस अधीन राहून असे अधिकार चालवितां येतील किंवा कामें करतां येतील त्या शर्ती व मर्यादा ;

(ह) नोकरवर्ग व शासनविषयक इतर उपाययोजना यांवर निधीच्या ज्या शेंकडा प्रमाणापेक्षां अधिक खर्च करण्याचा मंडळास अधिकार असणार नाहीं तें शेंकडा प्रमाण ;

(आय्) अधिनियमान्वयें ठेवावयाचीं नोंदणी पुस्तकें व कागदपत्रें ;

(ज) निधींतून ज्या कार्यांना आर्थिक मदत देण्यांत येते त्या कार्यांचें प्रतिवृत्त आणि निधीचें उत्पन्न व खर्च यांचें पत्रक व हिशेबाचें पत्रक प्रसिद्ध करणें ;

(के) या अधिनियमान्वयें विहित करण्यांत येईल किंवा करतां येईल अशी इतर कोणतीहि बाब.

२०. मंडळाचे सदस्य, वेल्फेअर कमिशनर, निरीक्षक व मंडळाचे सर्व अधिकारी व नोकर हे भारतीय दंड संहिता कलम २१ च्या अर्थ कक्षेंत सरकारी नोकर आहेत असें समजलें पाहिजे. मंडळाचे सदस्य वेल्फेअर कमिशनर, निरीक्षक व मंडळाचे सर्व अधिकारी व नोकर हे सरकारी नोकर म्हणून समजणें.

सद्भावना-पूर्वक काम करणाऱ्या इसमाचें संरक्षण.

२१. या अधिनियमान्वयें सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याहि कृत्याबद्दल कोणत्याहि इसमाविरुद्ध कोणताहि दावा, खटला किंवा कायदेशीर कारवाई करतां येणार नाहीं.

माफी.

२२. राज्य सरकारला, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येतील अशा अटींस अधीन राहून, कोणत्याहि वर्गाच्या संस्थेस या अधिनियमाच्या उपबंधांपासून माफी देण्याचा अधिकार आहे.

सन १९३६ चा अधिनियम क्रमांक ४, कलम ८ ची सुधारणा.

२३. वेतन देण्याविषयीं अधिनियम, १९३६, कलम ८, पोट-कलम (८) मध्यें स्पष्टीकरणापूर्वी पुढील मजकूर दाखल करावा :—

"परंतु, मुंबई कामगार कल्याण निधि अधिनियम, १९५३, ज्या कोणत्याहि कारखान्यास किंवा संस्थेस लागू असेल त्या कारखान्याच्या किंवा संस्थेच्या बाबतींत, वसूल केलेल्या अशा सर्व रकमा या अधिनियमान्वय स्थापन केलेल्या निधींत जमा केल्या पाहिजेत."

# THE BOMBAY PERSONAL INAMS ABOLITIONS ACT, 1952

## (Bombay XLII of 1953)

## मुंबईजात इनामें नाहींशीं करण्याबाबत अधिनियम, १९५२

### अनुक्रमणिका


प्रस्तावना.

| कलमें. | | पान |
|---|---|---|
| १. | लघु संज्ञा, व्याप्ति व सुरुवात ... ... ... ... ... | १०५३ |
| २. | व्याख्या ... ... ... ... ... ... ... | १०५३ |
| ३. | अधिनियम विवक्षित इनामांना व अनुदानांना लागू नसणें ... ... ... | १०५४ |
| ४. | जात इनामें व इनामांच्या संबंधांतील हक्क नाहींसा करणें ... ... ... | १०५४ |
| ५. | इनाम गांव किंवा इनाम जमीन यांची जमीन महसूल देण्याबाबतची पात्रता व इनामदार व कायम धारेकरी हा खातेदार म्हणून असणें. | १०५५ |
| ६. | रोकड भत्ता रद्द केल्याबद्दल नुकसानभरपाई ... ... ... ... | १०५५ |
| ७. | इनाम गांवांत असलेले सर्व सार्वजनिक रस्ते वगैरे सरकारमध्ये निहित होणें ... | १०५५ |
| ८. | झाडांसंबंधीचे हक्क ... ... ... ... ... ... | १०५५ |
| ९. | खाणी व खनिज पदार्थ यांवरील हक्क ... ... ... ... ... | १०५६ |
| १०. | कलम ७ अन्वयें हक्क नाहींसा झाल्याबद्दल इनामदारांना नुकसान भरपाई ... ... | १०५६ |
| ११. | कलेक्टरच्या निवाड्याविरुद्ध अपील ... ... ... ... ... | १०५६ |
| १२. | महसूल न्यायाधिकरणापुढें काम चालविण्याची रीत ... ... | १०५७ |
| १३. | मुदत ... ... ... ... ... ... ... | १०५७ |
| १४. | न्यायालय शुल्क ... ... ... ... ... ... | १०५७ |
| १५. | निवाड्याच्या व महसूल न्यायाधिकरणाच्या निकालांचे निर्णयकत्व ... ... | १०५७ |
| १६. | चौकशी व कामकाज हे न्यायसंबंधीं कामकाज असणें ... ... ... | १०५७ |
| १७. | मालमत्तेंतील इतर हक्क नाहींसा करणें वगैरेबद्दल नुकसान भरपाई देण्याची रीत ... | १०७७ |
| १७-अ. | हस्तांतरित कर्जरोख्यांच्या स्वरूपांत नुकसान भरपाईची रक्कम देण्याजोगी असणें ... | १०५८ |
| १८. | सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६७ चे उपबंध इनामदार व कुळें यांच्या संबंधांना लागू असणें. | १०५८ |
| १९. | नियम ... ... ... ... ... ... ... | १०५८ |
| २०. | विवक्षित अधिनियमांत फेरफार करणें व ते लागू असण्याचें बंद होणें ... ... | १०५८ |
| | अनुसूचि १. | |
| | अनुसूचि २. | |